दै. गोदातीर दि. 17-02-2022

दै. गोदातीर दि. 17/2/2022

# सहाय्यक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव यांचा जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून सन्मान



**मुक्रमाबाद** – मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव यांना पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथे प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हसनाळ येथील खुनाचा २८ दिवसांत उलगडा करून आरोपीताने खून करून पुरून टाकलेले प्रेत शोधून तपास केल्या कामाबद्दल नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे एका आयोजित विशेष कार्यक्रमात जिल्हा पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांच्या हस्ते सहाय्यक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव यांना सन्मानित करण्यात आले आहे.

हसनाळ येथील खुनाच्या घटनेचा एका महिन्यात उलगडा करून आरोपीताने खून करून पुरून टाकलेले प्रेत शोधून काढल्याबद्दल आणि तपासात केलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. असेच उत्कृष्ट कर्तव्य बजावून गोरगरीब नागरिकांना चांगली सेवासाठी भर टाकतील अशी अपेक्षा शेवाळे यांनी केली.

त्यांना हा सन्मान मिळाल्याबद्दल माजी पंचायत समिती सदस्य शिवराज आवडके, माजी सरपंच श्रीकांत काळे, चेअरमन बबन पाटील गोजेगावकर, सरपंच प्रतिनिधी योगेश देवकत्ते, उपसरपंच नागनाथ रेड्डी, उपसरपंच दिगा पाटील, बालाजी पाटील लखमापूरकर, अमजद पठाण, गंगाधर चामलवाड, नंदकुमार खंकरे, लक्ष्मण कोळेकर, मझर पठाण, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवशंकर पाटील कलंबरकर, बालाजी पसरगे, हेमंत खंकरे, जलालोदीन सय्यद, इंसाफचे जिल्हा समन्वयक जलील पठाण, दिनेश आवडके, विश्वानाथ खळूरे आदींनी अभिनंदन केले आहे.

दै. गोदातीर दि. 17-02-2022

दै. गोदातीर दि. 17/2/2022

# वाटमारी करून हजारोंची देशी दारू पळविली; दोघांना पोलीस कोठडी

**नांदेड** – रस्ता आडवून टेम्पोमधून सहा हजारांची देशी दारू जबरीने लंपास केली. विमानतळ पोलिसांनी दोन चोरट्यांना अटक केली. त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोघांनाही पोलीस कोठडीत पाठवले आहे.

दि. १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास एका देशी दारु वाहतूक करणाऱ्या टेम्पोला थांबवून त्यातील दोन दारूचे बॉक्स बळजबरीने चोरणाऱ्या दोन चोरट्यांना विमानतळ पोलिसांनी काही तासातच अटक केली. ज्ञानोबा निवृत्ती भेरजे (वय ३२) रा. संत कबीरनगर, सिडको पाण्याच्या टाकीजवळ हे आपला टॅम्पो क्रमांक (एमएच२६- एच- ४८४७) मध्ये देशी दारुचे बॉक्स घेवून १४ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास जात होते. त्यांचा टेम्पो ग्यानमाता शाळेच्या रस्त्यावर (एमएच२६- वाय.८५६५) या दुचाकीवर आलेल्या दोन चोरट्यांनी त्याला टेम्पोखाली उतरवून धक्काबुक्की केली, आणि टेम्पोतील दारुचे दोन बॉक्स पाच हजार ७६० रुपयांचे जबरीने चोरून नेले.

विमानतळ पोलिसांनी हा गुन्हा दाखल होताच पोलीस उपनिरीक्षक एकनाथ देवके यांच्याकडे तपास देण्यात आला.

पोलीस निरीक्षक संजय ननवरे यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ देवके यांनी या देशी दारू चोरट्यांना काही तासातच पकडले. त्यांची नावे कैलास गोविंदराव कोल्हे (वय २५) रा. गोविंदनगर नांदेड, अभिजित उर्फ गोलू सुभाष डाकोरे (वय २०) रा. गांधीनगर अशी आहेत. दारू लुटताना वापरलेली ७५ हजार रुपये किंमतीची दुचाकी गाडी क्रमांक (एमएच-२६ वाय- ८५६५) पोलिसांनी जप्त केली आहे.